## दोषारोप

मी, श्रीमती एस. वाय. सुळ, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर खालीलप्रमाणे दोषारोप करीत आहे.

**सुरेश रामा फुलमाळी,**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,
रा.भेंडा, ता. नेवासा, जि.अहमदनगर.

**यांचेवर खाली नमुद केलेप्रमाणे आरोप ठेवते –**

तुम्ही दिनांक ०७/०८/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजेच्या सुमारास मौजे भेंडा, ता. नेवासा येथील तळ्याजवळ तुम्ही फिर्यादीचा वियभंग करण्याच्या उद्शाने फौजदारी पात्र बलप्रयोग करून तिच्या दोन्ही हातास धरून ओढतान केली, फिर्यादीच्या अंगावरील कपडे ओढून फाडले व तिला लज्रा उत्पन्न होईल असे कृत्य करुन फिर्यादीचा विनयभंग केला व त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३५४** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

२. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही फिर्यादीच्या दोन्ही हातास धरून ओढतान केली, तिच्या अंगावरील कपडे फाडले व त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३५४(अ)** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

३. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही फिर्यादीला लाथाबुक्यांनी व नखांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली व त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपांबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

**स्वाक्षरीत/–**

दिनांक–१४/०८/२०२५. (**श्रीमती.एस.वाय.सुळ**)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा

आरोपीवरील दोषारोप तयार करण्यात आले व त्याला त्यातील मजकुर त्याच्या भाषेत समजावून सांगणेत आला.

**स्वाक्षरीत/–**

दिनांक– १४/०८/२०२५. (**श्रीमती.एस.वाय.सुळ**)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा